सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

क्र. ३४] बुधवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ : कार्तिक २५, शके १९४४ [किंमत ०.०० रु.]

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग एक-अ औरंगाबाद विभाग

१

**जिल्हाधिकारी जालना यांचेकडून**

**क्र. २०२२/नपाप्र/कार्या-२/कावी.-** ज्यार्थी या कार्यालयात महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ च्या ७ अन्वये अर्ज दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर अर्जावर सुनावणी घेऊन उभय पक्षकारांना पुरेशी संधी देण्यात आली त्यानुसार अर्जदार व गैरअर्जदार यांनी सादर केलेल्या लेखी युक्तीवादानंतर सर्व दोषारोपांचे विवेचन विचारात घेता गैरअर्जदार यांनी त्यांच्या मुळे राजकीय पक्षाच्या नेत्याद्वारे जारी करण्यात आलेल्या निर्देशाचे उल्लंघन केलेले असल्याने ते उक्त अधिनियमांच्या कलम ३ (१) (ब) नुसार या कार्यालयाचे आदेश जा.क्र. २०२२ न.पा.प्र. कार्या.-१/कावि-५५७ दि. १९.०९.२०२२ नुसार खालील नमुद सदस्य, नगरपंचायत जाफ्राबाद जि. जालना यांना दि. १६.०२.२०२२ पासून उर्वरीत काळासाठी सदस्य म्हणून अनर्ह ठरवण्यात आले आहे.

त्याअर्थी नगर पंचायत जाफ्राबाद येथील अनर्ह ठरवण्यात आलेल्या सदस्यांचे नावे महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८७ चे कलम ८ (३) अन्वये अधिसूचीत करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | नगर पंचायत | सदस्याचे नाव | अनर्ह ठरविण्यात आलेला कालावधी |
|---|---|---|---|
| १ | जाफ्राबाद | श्रीमती शशिकलाबाई भ्र. विजयकुमार हिवाळे, सदस्य नगर पंचायत | दि. १६.०२.२०२२ पासुन उर्वरीत काळासाठी |
| २ | जाफ्राबाद | श्रीमती शेख शाहीनबी भ्र. तैजीब कुरैशी, सदस्य नगर पंचायत | दि. १६.०२.२०२२ पासुन उर्वरीत काळासाठी |

**दिनांक ०२.११.२०२२.**

**(डॉ. विजय राठोड)**
**जिल्हाधिकारी जालना**

---



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.